# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## अपिल क्रमांक : के.आर-८१८/२०२२ (तक्रार)

तक्रारकर्ता, श्री.अजित सदाशिव खरात
सदा सुरेख निवास, रो हाऊस बंगला-४
वसंत विहार गार्डन्स, सीटी हॉस्पिटल समोर
अंबरनाथ पूर्व, जि.ठाणे ४२१ ५०१

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनि. अभियंता, जल निसारण व पाणी पुरवठा विभाग,बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), जि.ठाणे

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनि. अभियंता, जल निसारण व पाणी पुरवठा विभाग,बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), जि.ठाणे

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ४.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २.११.२०२१ | ८.२.२०२२ | २०.१२.२०२१ | ११.१.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१८.४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती न दिल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ४.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"(शहरातील भुयारी गटार योजनेचे मार्फत कामासंदर्भात).."

अ. भुयारी गटार योजन राबविण्याबाबतचा ठराव.
आ. सदर जनरल बॉडी मिटींगचे इतिवृत्त.
इ. सदर कामाकरीता नेमलेले ठेकेदार कंपनीचा बायोडाटा.
ई. भुयारी गटार योजनेकरीता शहराचा नियोजित आराखडा.
उ. भुयारी गटार योजनेचा वॉर्ड निहाय आराखडा.
ऊ. भुयारी गटार योजनेचे कामाची वर्क ऑर्डर.
ऋ. भुयारी गटार योजनेच्या कामाकरीता कार्यान्वित करणारे नगरपरिषदेच्या विभागाचे नाव.
ऌ. भुयारी गटार योजना राबविण्याकरीता नेमणूक केलेले अधिकारी यांची नावे, हुद्दा व त्यांच्या जबाबदा-या.
ऍ. संदर्भातील अधिकारी यांचे तांत्रिक कॉलिफिकेशन व अनुभव याबाबत माहिती.
ऐ. भुयारी गटार योजना राबवावी गेली तत्कालीन मा. मुख्याधिकारी यांचे नाव व या कामादरम्यान मुख्याधिकारी यांची जबाबदारी.
ए. भुयारी गटार योजनेच्या कामाकरीता मंजुर निधी.
ऐ. निधी कमी पडण्याचे कारण.
ऑ. निधी वाढविण्याकरीता केलेले नियोजन.
ऒ. वाढीव मंजूर निधीकरीता जनरल बॉडी ठराव.
ओ. मंजूर निधीची रक्कम त्याबाबतचे पत्र.
औ. काम पूर्णत्वाचे एम. बी. सीट्सच्या प्रती.
अं. ठेकेदारास व इतरांस संदर्भातील कामाबाबत वारंवार अदा केलेले बिलाची रक्कम चेक/कॅश व दिनांक याबाबतचे आकडेवारीचा तक्ता.
अः. भुयारी गटारासंदर्भात जनतेच्या आलेल्या तक्रारींची संख्या.
अअ. तक्रारींबाबत केलेले समाधान व त्याकरीता केलेला खर्चाची रक्कम, कामाचे स्वरूप यांचे विश्लेषण.

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती देण्यासाठी टाळाटाळ." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशानंतर दि.८.२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये तक्रारकर्ता यांना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

"संदर्भिय विषयांकित प्रकरणी आपण अपेक्षिलेली माहिती विस्तृत स्वरूपाची असल्याने नस्ती छायांकित करणे व एकत्रितकरण करणेस विलंब होत असल्याने सदर माहिती आपणांस दि.१०.२०२२ रोजी दु. ४.०० वाजेपर्यंत टपाल अथवा समक्ष उपलब्ध करून देण्यात येईल."

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

"अपिल मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा व जलनिस्सारण विभाग यांनी जी माहिती उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना ७ दिवसांत दयावी. सबब सदरील माहिती अधिकार प्रथम अपिल निकाली काढण्यात येत आहे."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी सुनावणीची नोटीस देऊनही अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या तक्रार अर्जासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच तक्रारकर्ता यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी सुनावणी दरम्यान युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपर्यंत वारंवार माहिती मागूनसुध्दा देण्यात येत नाही.

नगर अभियंता, अंबरनाथ नगरपरिषद यांनी दि.४.४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आयोगास असे कळविले आहे की, आज दुपारी १२.०० वाजता सर्व सेक्टर ऑफिसर यांचे EVM हाताळणीचे प्रशिक्षण असल्यामुळे त्यांना आजच्या सुनावणीसाठी उपस्थित राहणे शक्य होणार नाही. तरी त्यांना सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात यावी. सबब, त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.६.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ एप्रिल, २०२४

**अपिल क्रमांक : के.आर-८१८/२०२२ (तक्रार)**

तक्रारकर्ता, श्री.अजित सदाशिव खरात

**सुनावणी दिनांक ६.५.२०२४ (In continuation of order dt. ४.४.२०२४)**

**विवेचन**

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि.१८.४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दि.६.५.२०२४ रोजी पुर्नसुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी नगर अभियंता, अंबरनाथ नगरपरिषद हे आजही अनुपस्थित आहेत. दि. ४.४.२०२४ त्यांनी पुढील तारीख मिळणेबाबत विनंती केली होती. मात्र, ते आजही अनुपस्थित आहेत. याबद्दल त्यांनी आयोगास काहीही कळविले नाही.

सबब, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपर्यंत पुरविण्यात आलेली नाही. या विलंबाकरीता प्रथमदर्शनी तत्कालीन जन माहिती अधिकारी जबाबदार दिसतात. सबब, तक्रारकर्तास माहिती पुरविण्यास झालेल्या प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी त्यांना रु.२५०/- (अधिकतम रु. २५,००/-) एवढी शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबत विचारणा करणारी "कारणे दाखवा" नोटीस पाठविणे उचित होईल तसेच त्यांचा लेखी खुलासादेखील मागविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनि. अभियंता, जल:निस्सारण व पाणी पुरवठा, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु. २५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून दि.३०.५.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता सादर करावा. अन्यथा त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

सही/-

**(शेखर चन्ने)**

राज्य माहिती आयुक्त,

कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ६ मे, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कनि. अभियंता, जल निसारण व पाणी पुरवठा विभाग,
बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद,
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), जि.ठाणे
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनि. अभियंता, जल निसारण व पाणी पुरवठा विभाग,
बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), जि.ठाणे **यांचेमार्फत रवाना.**

**अपिल क्रमांक : के.आर-८१८/२०२२ (तक्रार)**

तक्रारकर्ता, श्री.अजित सदाशिव खरात

**सुनावणी दिनांक ३०.५.२०२४ (In continuation of order dt. ६.५.२०२४)**

**विवेचन**

तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि.१८.४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३०.५.२०२४ रोजी पुर्नसुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता, जल निस्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता यांनी दि.३०.५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरूपाची असल्याने त्यांना नेहमी अवगत केले जात होते की आपणास जी काही माहिती आवश्यक आहे त्या दस्तऐवजांची पाहणी करून माहिती घेऊन जाणे. परंतु त्यावर तक्रारकर्ता यांचे असे म्हणणे असायचे की मला मुद्दयांनुसार माहिती दयावी.

या प्रकरणी सदर प्रकल्पावर श्री. प्रविण बिर्ला, शाखा अभियंता हे काम पाहत होते. त्यावेळी सदर प्रकल्पाचे ९० टक्के काम पूर्ण झाल्याने त्यांची अन्य ठिकाणी बदली झाली असल्याने त्यांचा चार्ज माझ्याकडे आला. कामाचा प्रचंड आवाका असल्याने व जुन्या फाईलचा पत्रव्यवहार त्यांनी हाताळल्याने कामाच्या फाईल्समधून अमुक एक कागदपत्रे मला देणे शक्य झाले नाही असे त्यांनी नमूद केले. माहिती लपविण्याचा व न देण्याचा त्यांचा उद्देश नव्हता असेही त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांचा हा लेखी खुलासा मान्य करता आला असता, जर त्यांनी तीस दिवसांच्या विहित कालावधीनंतर अथवा थोडया कालावधीने माहिती उपलब्ध करून दिली असती. परंतु, जवळपास अडीच वर्षांच्या कालावधीनंतर जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचा लेखी खुलासा सादर केला आहे. सबब, तक्रारकर्तांना माहिती प्राप्त होण्यास झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये शास्ती आकारणे आवश्यक वाटते. यास्तव त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु. २५,०००/- एवढी शास्ती आकारणे उचित होईल.

त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आता संपूर्ण माहिती तयार आहे व ती तक्रारकर्ता यांना देण्यात येत आहे असे निवेदन केले. सबब, सदरची माहिती त्यांनी तक्रारकर्ता यांना पुढील २ दिवसांत विनामुल्य पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जल निस्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी **तक्रारकर्ता यांना संपूर्ण माहिती पुढील २ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना २ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता, जलनिस्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपिल आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये रु. २५,०००/- (अक्षरी रु. पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून ५ मासिक हप्त्यात वसूल करून लेखाशिर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००-इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षाखाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करून पूर्तता अहवाल अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी आयोगास सादर करावा.

१. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
**दिनांक : ३० मे, २०२४**
**प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना .**

संगणक-११

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई यांचे कार्यालय, १३ वा मजला,
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२. उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, ५ वा मजला,
दालन क्र. ५२७/५२८, कोंकण भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
३. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. आहरण व संवितरण अधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,
टिळक पथ, के.बी. रोड, अंबरनाथ, जि. ठाणे.
५. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता,
जल निसारण व पाणी पुरवठा विभाग, बांधकाम विभाग, अंबरनाथ नगरपरिषद,
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प), जि.ठाणे

**( In Continuation of order dt.३०.०५.२०२४)**

**विवेचन**

उपरोक्त दि.३०.०५.२०२४ रोजीच्या आदेशान्वये आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांना तक्रारकर्ता यांना ०२ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने माहिती पुरविणेबाबत आदेशीत केले होते. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार तक्रारकर्ता यांना माहिती पुरविलेली नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांनी आयोगाकडे दि.१०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये लेखी अर्ज सादर केला आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले की, त्यांच्या तक्रारीवर मा.कोकण खंडपीठाने दिनांक ०६.०५.२०२४ व दिनांक ३०.०५.२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ विभागाने ०२ दिवसांत संपूर्ण माहिती द्यावे असे आदेश होते. पण आज ८ महिने झाले तरी त्यांना माहिती मिळालेली नाही.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतर अद्यापही माहिती दिलेली नसल्याने, याप्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (३) अंतर्गत चौकशी करणे योग्य होईल, असे आयोगाचे मत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांना आयोगाच्या दि.३०.०५.२०२४ रोजीच्या आदेशानंतरही माहिती न दिल्यामुळे याप्रकरणात चौकशीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता, जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांची आयोगासमोर उपस्थिती आवश्यक आहे, या चौकशी करिता उपस्थित राहणेस्तव उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ यांनी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता, जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८(३)(क) अन्वये तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढील सुनावणीस उपस्थित राहणेबाबत समन्स काढण्यात यावे. सदर समन्स ची बजावणी अंबरनाथ पोलीस स्टेशन, अंबरनाथ तसेच पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे मार्फत करण्यात यावी.
२. प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि.०८.०९.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

उपसचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग,
कोकण खंडपीठ, कोकण भवन, ५ वा मजला,
रु.न.५२७, ५२८, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार महादेव जाधव,
कनिष्ठ अभियंता, जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ, टिळक पथ के.बी.रोड,
अंबरनाथ (प.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे ४२१ ५०१.

## सुनावणी दिनांक ०८.०९.२०२५ (In continuation of order dt. ०४.०८.२०२५)

### विवेचन

उपरोक्त दि.०४.०८.२०२५ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नसल्यामुळे, त्यांना समन्स बजावण्याचे आदेश पारित केले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०८.०९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार ग.जाधव, कनिष्ठ अभियंता, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुनिलकुमार महादेव जाधव, कनिष्ठ अभियंता, जल नि:स्सारण व पाणी पुरवठा विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, आयोगाच्या आदेशानुसार दि.२५.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार करण्यात आली असून, तक्रारकर्ता यांना प्रत्यक्ष बोलावून समक्ष माहिती दाखवण्यात आली व सदर माहिती घेऊन जाण्यास सांगितले. परंतु तक्रारकर्ता यांनी रकाना बनवुन व माहिती अधिकाराचा स्टॅम्प मारुन माहिती हवी असल्याचे सांगितले. तद्नंतर त्यांना हवी असलेली माहिती तयार करुन दाखविण्यात आलरी व माहिती घेऊन जाण्यास सांगितले परंतु ते नंतर घेऊन जातो असे सांगून आले नाहीत. आपल्याकडून ही ही माहिती अनावधनाने टपालाद्वारे पाठविण्याचे राहून गेले.

जन माहिती अधिकारी यांचे या खुलाश्यावरुन असे दिसून येते की, त्यांनी अद्यापपर्यंत माहिती तक्रारकर्ता यांना दिलेली नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांना माहिती मिळण्यास विलंब झाला आहे. या विलंबासाठी मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. आयोगाच्या आदेशानंतरही विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना माहिती पुरविलेली नाही. तक्रारकर्ता यांना माहिती मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई म्हणून मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ यांनी तक्रारकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.०९.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ सप्टेंबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,
टिळक पथ के.बी.रोड, अंबरनाथ (प.) ४२१ ५०१.